RNI : MHMAR/25/A0848 epaper.shikshanastra.com Shikshanastra@gmail.com 79722 12030 79722 12030

# दैनिक शिक्षण अस्त्र




शुक्रवार दि. १२ जुन २०२६ अंक ● १८० ● ● किमंत २ रू ● ● पाने 4 ● संपादक : संदिप नारायण ठाकरे

## 11 वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत 76318 जणांनी नोंदविला पसंती क्रम

### 13 जून रोजी कॉलेज वाटप यादी होणार प्रसिद्ध

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : छत्रपती संभाजीनगर: अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत दुसऱ्या फेरीसाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील 76 हजार 318 विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम नोंदविला आहे. 13 जून रोजी कनिष्ठ महाविद्यालय वाटप यादी (अ‍ॅलॉटमेंट) जाहीर होणार आहे. राज्यात अकरावी प्रवेशासाठीची प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. यात दुसऱ्या फेरीसाठीची नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, पसंतीक्रम नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांना सहा ते नऊ जून दरम्यान मुदत देण्यात आली होती. या दुसऱ्या फेरीसाठी नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, भाग-1 दुरुस्ती करणे, पसंतीक्रम अर्ज भाग-2 भरण्याची प्रक्रियेसाठी चार दिवसांची मुदत देण्यात आली होती. यात दुसऱ्या फेरीसाठी राज्यभरात सहा लाख 80 हजार 786 विद्यार्थ्यांनी पसंतक्रम नोंदवून अर्ज लॉक केलेले आहेत. यामध्ये मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर विभागातील पाच जिल्ह्यातील




76 हजार 318 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ये कॅप-2 फेरीतील पसंतीक्रम नोंदविण्याऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 66 हजार 708 आहे. इनहाउस कोटा यातून तीन हजार 205, व्यवस्थापन कोटा 3,304 तर अल्पसंख्याक कोटा यातून तीन हजार 101 विद्यार्थी आहेत. तर लातूर विभागातील तीन जिल्ह्यातील 40 हजार 792 विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम नोंदवून अर्ज लॉक केलेले आहेत.

दुसऱ्या फेरीतील अ‍ॅलॉटमेंट यादी 13 जून रोजी सकाळी दहा वाजता जाहीर करण्यात येणार आहे. कागदपत्रे पडताळणी, प्रत्यक्ष प्रवेश निश्चितीची प्रक्रिया 13 जून ते 16 जूनपर्यंत पूर्ण करता येणार आहे. यानंतर तिसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांची यादी 19 जून रोजी जाहीर केली जाणार आहे.

## विद्यापीठाच्या प्रवेश पोर्टल अ'समर्थ'? ; तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थी त्रस्त

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ एकीकडे विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या वाढवण्यासाठी प्रज्ञावेधसारखे उपक्रम राबवत आहे, दुसरीकडे याच विद्यापीठाच्या 'समर्थ' पोर्टलवरून प्रवेश प्रक्रिया होत नसल्याच्या तक्रारीही वाढत आहेत. मागील तीन दिवसांपासून काही विद्यार्थी प्रवेशासाठी आतुर असताना त्यांना तांत्रि अडचणींचा सामना करावा लागत विद्यापीठातील विद्यार्थी संख्येचा आलेख दरवर्षी उतरताच असल्याचे सांगण्यात येते. विद्यापीठाच्या पत्रकार बैठकीतही विद्यार्थी संख्येचा विषय यापूर्वी निघालेला आहे. नोक□याच नाहीत तर विद्यार्थी संख्या वाढणार कशी, असे खासगीत बोलताना

> समर्थ पोर्टलवर प्रवेशाशी संबंधित कुठलीही तांत्रिक अडचण येत नाही. प्रमाणपत्रे डकवताना त्याच्या आकारमानाला मर्यादा असल्याने त्या संदर्भातील अडचण येऊ शकते. एरर सांगत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. पासवर्डसाठी अक्षर मोठे-छोटेही सांगितले जाते. 3 जूनपासून 540 प्रवेश झाले आहेत. विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचण वाटत असेल तर त्यांनी पीजी विभागाशी संपर्क करावा.
> **- प्रा. डॉ. प्रवीण यन्नावार,**
> प्रमुख, प्रवेश प्रक्रिया समन्वय समिती

प्राध्यापक, विभाग प्रमुख बोलून दाखवतात. 2018 पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांची संख्या संपूर्ण विद्यापीठातील 42 विभाग व धाराशिव उपपरिसरातील 10 अशा मिळून 52 विभागात पाच हजारांच्या आतच राहिलेली आहे. काही विभागांत पदवीचेही विद्यार्थी असल्याने विद्यार्थी संख्या किमान सांगण्यासारखी असते, असे सांगितले जाते.

विद्यापीठाने 5 व 6 जून रोजी दोन दिवसीय प्रज्ञावेध महोत्सव (एक्स्पो) घेतला. विद्यार्थी वाढवण्यासाठी हा एक स्पो असल्याचे विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या पत्रकार बैठकीतच सांगण्यात आले होते. या प्रवेशवाढीच्या उपक्रमाला अपेक्षेएवढा प्रतिसाद मिळाला नसला तरी त्यातून काही प्रमाणात विद्यार्थी संख्या वाढेल, इतका तो यशस्वी झाल्याचा दावाही केला जातो. यानंतर काही विद्यार्थी, विद्यार्थिनींनी प्रवेशासाठी सुरुवात केली. मात्र, त्यांना विद्यापीठाच्या 'समर्थ' पोर्टलवरून अर्ज भरताना तांत्रि अडचणींचा सामना करावा लागत' असल्याच्या तक्रारीही केल्या आहेत. अर्ज च नोंद (रजिस्ट्रर) होत नाही, कॅपिटल लेटर अक्षराच्या पायरीवरही समस्या निर्माण होत असून, मोबाईल फोनवरूनच नव्हे तर बाहेरील संगणक संस्थांवरूनही (कॅफे) अर्ज भरला तरी तो पुढे सरकत नाही, विशेष म्हणजे तुम्हाला कुठे अडचण आहे, यासंदर्भातील संदेशही येत नाही, अशा अडचणी असल्याचे विद्यार्थी सांगत आहेत.

## विदर्भात शाळा 30 जूनलाच , उच्च न्यायालयाने खडसावले; शिक्षण विभागाचा निर्णय रद्द

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : नागपूर : विदर्भातील शाळा 22 जूनपासून सुरू करण्याचा राज्यशासनाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवारी रद्द ठरविला. यासोबतच न्यायालयीन सुनावणी सुरू असताना शिक्षण संचालकांनी 9 जून रोजी काढलेले 22 जूनपासून शाळा सुरू करण्याचे पत्रही न्यायालयाने अवैध ठरवत रद्द केले. त्यामुळे आता 20 एप्रिल 2023 च्या शासननिर्णयानुसार विदर्भातील शाळा 30 जूनपासूनच सुरू कराव्या लागणार आहेत, असे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि

> ### अवमान कारवाईचा इशारा
> न्यायालयाने विदर्भातील तापमान, विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि यापूर्वीचे न्यायालयीन आदेश लक्षात घेत 23 एप्रिल 2023 रोजीचा शासननिर्णय अंतिम ठरविला. त्यानुसार शाळा 30 जून व त्यादिवशी सुटी असल्यास त्यानंतरच्या शासकीय कामकाजाच्या दिवशीच सुरू कराव्यात, असे स्पष्ट केले. तसेच आजवरच्या न्यायालयांच्या आदेशांकडे शिक्षण संचालकांकडून दुर्लक्ष झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि शासननिर्णय अस्तित्वात असताना शिक्षण संचालकांनी स्वतः पत्र काढणे योग्य नसल्याचेही खंडपीठाने नमूद केले. तसेच भविष्यात विदर्भातील शाळा सुरू करण्याच्या निर्णयात बदल करू नयेत व तसे झाल्यास पुढील वेळेस संचालकांवर अवमान कारवाई केली जाईल, असा इशाराही दिला.

जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर बुधवारी न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मंगळवारी झालेल्या सुनावणीत खंडपीठाने राज्य शासनाला, 2007 मधील न्यायालयीन निर्णय अस्तित्वात असताना विदर्भातील शाळा 15 जूनपासून सुरू करण्याचा निर्णय का घेण्यात आला, असा तोंडी प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर राज्य सरकारने मंगळवारी, नऊ जून रोजी संध्याकाळी नवे परिपत्रक काढून, 'विदर्भातील शाळा 22 जूनपासून सुरू व्हाव्यात,' असे परिपत्रक काढले. बुधवारच्या सुनावणीदरम्यान सरकारतर्फे अ‍ॅड. दीपक ठाकरे यांनी हे नवे परिपत्रक सादर केले. यावर बुधवारी निकाल देताना न्यायालयाने शिक्षण संचालनालयाचे 28 मार्च रोजीचे परिपत्रक; तसेच नऊ जूनचे अशी दोन्ही परिपत्रके रद्द केली. याचिकाकर्त्यांतर्फे अ‍ॅड. भानुदास कुलकर्णी यांनी, जून महिन्यात विदर्भातील तापमान 42 ते 44 अंशांपर्यंत जात असल्याचे सांगितले.

## आरोग्य विद्यापीठाचा वर्धापनदिन साजरा

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : छत्रपती संभाजीनगर:नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा 28 वा वर्धापनदिन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) बुधवारी साजरा झाला. या निमित्त घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन होऊन विद्यापीठाचा ध्वज फडकावण्यात आला, तर ध्वजवंदनानंतर विद्यापीठाचे गीत झाले. या प्रसंगी डॉ. सुक्रे यांनी विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच्या शैक्षणिक, संशोधन व आरोग्यसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव केला. या वेळी उपअधिष्ठाता सर्वश्री डॉ. डी. के. गर्कळ, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. सिराज बेग, प्रा. डॉ. प्रभा खैरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचेता जोशी, प्रशासकीय अधिकारी दिलीप गोधने, ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके, शारीरिक प्रशिक्षण निर्देशक आशिका बरालिया आदींची उपस्थिती होती.



## कृषी विद्यापीठांच्या 3,723 पदांना मान्यता

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, मुंबई : राज्यातील कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी कृषी विद्यापीठांच्या 'अ' आणि 'ब' संवर्गातील एकूण 3,723 पदांच्या सुधारित आकृतीबंधाला मान्यता देण्यात आली आहे.

सन 2003 नंतर म्हणजेच 23 वर्षांनी नवीन आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यापीठांमधील मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक परिणामकारक होईल, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या गट-अ व गट-ब संवर्गातील पदांच्या सुधारित राज्य आकृतीबंधास शासनाने मंजुरी दिली आहे. कृषी विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

## 222 पदांसाठी जुलैमध्ये परीक्षा

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, छत्रपती संभाजीनगर : महापालिकेच्या 222 रिक्त पदांसाठी आठ आणि नऊ जुलै रोजी परीक्षा घेतली जाणार आहे. सर्व वरिष्ठ अधिकारी या परीक्षेसाठी पर्यवेक्षक म्हणून काम करणार आहेत. आयुक्त अमोल येडगे यांनी या बद्दलचा आदेश काढला आहे.

भरती करण्यासाठी महापालिकेने 'आयबीपीएस' या संस्थेशी करार केला आहे. 222 पदांसाठी 29 हजार उमेदवार पात्र ठरले आहेत. या उमेदवारांची परीक्षा घेण्याची तयारी संस्थेने केली आहे. परीक्षेसाठी पालिकेतील सर्व वरिष्ठ अधिकारी पर्यवेक्षक म्हणून काम करणार आहेत. परीक्षा पारदर्शक पद्धतीने पार पडावी, कोणत्याही प्रकारची अनियमितता त्यात होऊ नये याची खबरदारी अधिका-यांनी घ्यावी असे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

# अध्यापन, अध्ययनावर विचारमंथन एमजीएममध्ये परिषदेचे आयोजन

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीने 12 व 13 जून दरम्यान आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय शैक्षणिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'शैक्षणिक परिवर्तनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर : विविध विद्याशाखांचा समन्वय' या संकल्पनेवर आधारित ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य, व्यवस्थापन, अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञ, संशोधक यांचा सहभाग राहणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

परिषदेचा उद्घाटन समारंभ 12 जून रोजी सकाळी 9.15 वाजता रुक्मिणी सभागृह येथे ऋषिहूड युनिव्हर्सिटीचे कुलपती, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, केंद्रीय ग्राम विकास विभागाच्या सहसचिव रोहिणी भाजीभाकरे, एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, कुलपती अंकुशराव कदम, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. समारोप 13 जून रोजी दुपारी तीन वाजता रुक्मिणी सभागृह येथे केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सहसचिव संतोष अजमेरा, नॉर्थ बेंगलुरू युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. बी. के. रवी यांची प्रमुख उपस्थिती आहे. परिषदेत नावीन्यपूर्ण अध्यापन आणि अध्ययन पद्धती, शिक्षणातील समानता, विविधता आणि समावेशकता, आधुनिक विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन आणि अभिप्राय प्रणाली आदी विषयांचा समावेश आहे.

परिषदेत स्पेन, मोरोक्को, जॉर्डन, चीन, भारत, अमेरिका, ट्युनिशिया, अल्जेरिया आदी देशातील विद्यार्थी, संशोधक सहभागी होणार आहेत. परिषदेमध्ये संशोधनपर सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आंतरराष्ट्रीय पॅनेल चर्चासत्रे तसेच विविध शैक्षणिक सादरीकरणांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये डॉ. जब्बार अल-ओबैदी, डॉ. खलिल कतावनेह, डॉ. इमाने एल इमादी, डॉ. महंमद माउतास्सिम, डॉ. जकारी ग्रिफिथ, डॉ. मधुसूदन एन. राव आदींची उपस्थिती असणार आहे. पत्रकार परिषदेला डॉ. जॉन चेल्लादुराई, डायना फॉक्स, प्रा. उमा शर्मा, कुलगुरू डॉ. बी. के. रवी, डॉ. रेखा शेळके, डॉ. परमिंदर कौर आदींची उपस्थिती होती.

# अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती 'दी इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स'तर्फे प्रदान

पुणे : 'एआयएसएसएमएस' अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभियांत्रिकी विभागाच्या सहा विद्यार्थ्यांना 'दी इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), कोलकाता'तर्फे राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. शैक्षणिक गुणवत्ता, तांत्रिक कौशल्य आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या आधारे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

शिष्यवृत्ती मिळविणा-या विद्यार्थ्यांमध्ये दर्शन देवरे आणि नेहा काकडे (द्वितीय वर्ष), विश्वराज पाटील आणि तन्मय झुल्ले (तृतीय वर्ष), सुप्रिया चव्हाण (अंतिम वर्ष); तसेच रोशनी मोरे (माजी विद्यार्थिनी) यांचा समावेश आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. या प्रसंगी 'एआयएसएसएमएस' संस्थेचे मानद सचिव मालोजीराजे छत्रपती यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उल्लेखनीय यशाचे कौतुक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमणे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन भविष्यातही शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आवाहन केले.


या वेळी संस्थेचे मानद सहसचिव खजिनदार अजय पाटील; व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशासकीय अधिकारी ए. बी. भोसले उपस्थित होते. 'आयईआय' स्टुडंट्स चॅप्टरचे सल्लागार प्रा. एन. पी. मवाळे सल्लागार आणि विभागप्रमुख डॉ. एस. बी. धोंडे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले.

# आता दुसरीतले विद्यार्थी बोलणार फाडफाड इंग्रजी !

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, पुणे : सध्याच्या काळात इंग्रजी या भाषेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे केवळ इंग्रजी शब्दांची तोंडओळख न होता विद्यार्थ्यांचा इंग्रजी ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे या चारही कौशल्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने बालभारतीच्या माय इंग्लिश बुक या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे. त्यामुळे बौद्धिक क्षमता चांगली असलेली मुले दुसरीतच फाडफाड इंग्रजी बोलतील, असे चित्र स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात बालभारतीच्या माध्यमातून यंदा हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांना यंदा नवीन पुस्तकांची भेट देण्यात येणार आहे. शाळा सुरू झाल्यानंतर पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात ही नवीन पुस्तके पडणार आहेत. दुसरीच्या इंग्रजीच्या पुस्तकाची विभागणी एकूण चार युनिटमध्ये केली आहे. यातील एका युनिटमध्ये 11 धड्यांचा समावेश असून, यामध्ये कथा, कविता, चित्रकथा आदींचा समावेश आहे.

**विद्यार्थ्यांचा इंग्रजी ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे या चारही कौशल्यांचा विकास करण्याकडे कल**




पुस्तकात फक्त प्रश्नोत्तरे न देता निरीक्षण, चर्चा आणि स्वतःची मते मांडण्यास प्रोत्साहन दिले आहे. लहान मुलांना आवडेल अशी चित्रे व दृश्याधारित शिक्षणपद्धती वापरली आहेत. चित्रे पाहून बोलणे, जोड्या लावणे, गाणी, खेळ, संवाद, भूमिकानाट्य यांचा समावेश आहे. अफिस्ट इन द फॉरेस्ट या पाठात जंगलातील प्राणी एकत्र येऊन मेजवानी साजरी करतात अशी कथा आहे. या कथेच्या माध्यमातून मुलांना प्राणी नावे, अन्नपदार्थांची नावे आणि साधी इंग्रजी वाक्ये शिकवण्यासाठी तयार करण्यात येणार आहे. ए जॉयफूल ट्रीप या पाठात नीतूच्या आजोबाने तिला एक खेळण्याचे विमान भेट दिलेले असते. नीतूला ते विमान खूप आवडते आणि ती नेहमी त्याच्यासोबत खेळत असते. रात्री तिला स्वप्न पडते की ते विमान तिच्याशी बोलते आणि तिला शहरावरून फिरायला घेऊन जाते. प्रवासात ती रेल्वे, बोट, झेब्रा क्रॉसिंग आणि ट्रॅफिक सिग्नल पाहते. तिचा मित्र अमर देखील या आनंददायी प्रवासात सहभागी होतो. शेवटी नीतूची झोप मोडते आणि तिला कळते की तो एक सुंदर स्वप्नवत प्रवास होता. या पाठातून मुलांना विविध वाहतूक साधनांची ओळख (विमान, रेल्वे, बोट इ.), वाहतूक नियमांचे नंबर सॉन्ग, इट्स रेनिंग, ट्रींग ट्रींग, इंडिया आदी कविता तसेच धडे शिकवताना वर्गात धमाल येणार आहे. म्युझिक स्टोअर या पाठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बासरी, गिटार, तबला, पखवाज, वीणा, टाळ, पिपाणी, पियानो आदी वाद्यांच्या संदर्भात माहिती देऊन त्या वाद्यांचे कार्य आणि ओळख स्पष्ट करण्यात येणार आहे. यासह अन्य पाठांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शेती, व्यापार, हॉस्पीटल, निसर्ग, प्राणी, पालेभाज्या, वार्षिक कॅलेंडर, घड्याळ आदींची ओळख करून देण्यात येणार आहे. त्यामुळे इयत्ता इंग्रजीचे दुसरीचे पुस्तक विविध अंगांनी परिपूर्ण असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्राथमिक ज्ञान (झेब्रा क्रॉसिंग, ट्रॅफिक सिग्नल), कल्पनाशक्ती आणि स्वप्नांच्या जगाची मजा आदींबाबत माहिती देण्यात आली आहे.

### ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पुस्तक झेपणार का ?

शहरातील शिक्षणाचे महत्त्व पटलेले आई-वडील त्यांच्या मुलांचा पहिलीच्या अगोदर केजी, सीनिअर केजी, नर्सरी आदी इयत्तांमध्ये प्रवेश घेतात. त्यामुळे त्यांचा पाया काही प्रमाणात पक्का होतो. याउलट ग्रामीण भागातील मुलांचे प्रवेश एक तर थेट पहिलीत होतात किंवा झालेच, तर अंगणवाडीत होतात. त्याठिकाणी त्यांना शिकवणारे शिक्षक नसतात. यामुळे त्यांचा पाया कच्चा राहतो. अशा परिस्थितीत थेट दुसरीच्या वर्गातच विद्यार्थ्यांना इंग्रजी फाडफाड बोलायला येणारी रचना करणे हे शक्य नाही, असे मत पुस्तक परीक्षणासाठी दिलेल्या तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

# महापालिकेच्या शाळांचा बाजार; विद्यार्थ्यांसाठी मोजणार 25 हजार

## इंग्रजी माध्यमाच्या पाच शाळांचे खासगीकरण; नऊ वर्षांत देणार 100 कोटी रुपये

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, पुणे : महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या पाच शाळा खासगी संस्थेला चालविण्यास देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने 'स्थायी समिती' समोर मंजुरीसाठी ठेवला आहे. या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेशासह सर्व शालेय साहित्य महापालिकेकडून पुरविण्यात येत असतानाही प्रत्येक विद्यार्थ्यामागे 25 हजार रुपये या संस्थेला देण्यात येणार आहेत. नऊ वर्षांच्या कालावधीसाठी तब्बल 100 कोटी रुपये मोजावे लागणार आहेत. त्यामुळे स्वयंसेवी संस्थांच्या नावाखाली पालिकेच्या शाळांचा कसा बाजार मांडला, हे समोर आले आहे.

शहरातील वेगवेगळ्या भागांतील इंग्रजी माध्यमांच्या पाच शाळा 2007 पासून 'द आकांक्षा फाउंडेशन' या संस्थेकडून खासगी सहभागी तत्त्वावर चालविण्यात येत आहेत. या शाळांच्या इमारती, विद्युतव्यवस्था, भौतिक सुविधा तसेच डीबीटी योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गणवेश, शालेय साहित्य महापालिकेकडूनच पुरविले जाते, तर शिक्षक व अन्य कर्मचा-यांच्या वेतनाचा खर्च संबंधित संस्था सीएसआर निधीतून करते. मात्र आता सीएसआरचा निधी मिळविण्यास अडचणी येत असल्याचे कारण देत या संस्थेने महापालिका आयुक्तांकडे निधीची मागणी केली होती. त्यावर आयुक्तांनी तत्परता दाखवली. फक्त याच संस्थेला निधी दिला जातोय, हे दिसू नये, यासाठी या पाच शाळा चालविण्यासाठी डिसेंबर 2025 मध्ये निविदा प्रक्रिया राबवली.

दोन्ही वेळेस केवळ 'द आकांक्षा फाउंडेशन' या संस्थेचीच निविदा आली. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे 27 हजार रुपये इतका दर या संस्थेने दिला होता. मात्र, अंदाजपत्रकात 11 कोटींची तरतूद असल्याने संस्थेशी चर्चा करून प्रत्येक विद्यार्थ्यासाठी 25 हजार दर निश्चित केला. त्यानुसार साडेचार हजार विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी 25 हजार रुपये याप्रमाणे नऊ वर्षांसाठी देण्याचा प्रस्ताव स्थायीपुढे मंजुरीसाठी ठेवला आहे.

### अंदाजपत्रकात 11 कोटींच्या तरतुदीची खेळी

द आकांक्षा फाउंडेशन या संस्थेला शाळा चालविण्यास देण्याचे नियोजन किती पद्धतशीर करण्यात आले होते, हे महापालिकेच्या अंदाजपत्रकातील तरतुदीवर स्पष्ट होत आहे. चालू वर्षीच्या अंदाजपत्रकात संबंधित संस्था चालवत असलेल्या शाळांमध्ये महत्त्वाची कामे करण्याच्या बजेट हेडखाली 11 कोटींची तरतूद करून ठेवण्यात आली. विशेष म्हणजे, त्याच हिशोबाने निविदाही आल्या आहेत. त्यामुळे प्रशासनाकडूनच पद्धतशीरपणे या संस्थेला काम देण्याचा घाट घातला गेला असल्याचे स्पष्ट होत आहे.

### फेरविचाराचा ठराव मांडणा-यांची भाजप पदाधिका-यांकडून कानउघाडणी

द आकांक्षा फाउंडेशन ही संस्था भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याशी संबंधित असल्याची चर्चा आहे. महापालिकेच्या शिक्षण समितीत काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक अरविंद शिंदे यांनी शाळा चालविण्यास देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीत मंजुरीसाठी आल्याचे निदर्शनास आणले. तसेच, हा प्रस्ताव कसा चुकीचा असल्याचे सांगितले. त्यावर शिक्षण समितीच्या पदाधिका-यांनी या प्रस्तावाचा फेरविचार करून तो शिक्षण समितीपुढे मांडावा, असा ठराव मंजूर केला. हा ठराव मंजूर झाल्याचे समजताच भाजपच्या पालिकेतील एका बड्या पदाधिका-याने ठराव करणा-या पदाधिका-यांना हा वरिष्ठ नेत्यांचा प्रस्ताव असल्याची कल्पना दिली असतानाही तुम्ही फेरविचाराचा ठराव कसा केला? अशी विचारणा करीत त्यांची कानउघाडणी केल्याची चर्चाही पालिकेत रंगली होती.

# आरटीई शुल्क प्रतिपूर्तीसाठी 62.85 कोटी रुपये मंजूर

## उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार थकीत शुल्क प्रतिपूर्ती शाळांना देण्याचे निर्देश

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, पुणे : महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने आरटीईअंतर्गत 25 टक्के राखीव जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी 62.85 कोटी रुपये वितरीत करण्याचा महत्त्वाचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे.

शासन निर्णय 9 जून 2026 नुसार हा निधी प्राथमिक शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. हा निधी 2026-27 या आर्थिक वर्षासाठी वित्त विभागाच्या अखत्यारीतून उपलब्ध करून दिला असून, मुख्यतः उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार थकीत शुल्क प्रतिपूर्ती आणि न्यायालयीन प्रकरणांशी संबंधित शाळांना देय रक्कम भरण्यासाठी वापरण्यात येणार आहे.

शिक्षण संचालक, प्राथमिक यांनी वेळोवेळी शासनाकडे निधीची मागणी केली होती. या निधीचा वापर करताना 21 ऑगस्ट 2019 च्या शासन परिपत्रकानुसार पडताळणी करावी लागणार आहे. अनुदानित शाळांना हा लाभ लागू होणार नाही. सर्व खर्च 31 मार्च 2027 पूर्वी पूर्ण करणे अनिवार्य असून, उपयोगिता प्रमाणपत्र तातडीने सादर करावे लागेल. जिल्हास्तरावरील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणी करावी, असे निर्देश दिले आहेत. निर्णयामुळे आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या शाळांना दिलासा मिळणार आहे. सध्या राज्यात आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रिया सुरू असून, मोफत शिक्षणाच्या हक्काची अंमलबजावणी अधिक प्रभावी होण्यास मदत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आजपासून ऑनलाइन परीक्षा

## प्रवेशासाठी 8 हजार 804 विद्यार्थी देणार परीक्षा

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, पुणे : फुले पुणे सावित्रीबाई विद्यापीठातील विविध विभागांमध्ये अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 11 ते 13 जून या कालावधीत प्रॉक्टर्ड पद्धतीने ऑनलाइन परीक्षा घेतली जाणार आहे. संबंधित अभ्यासक्रमांसाठी 8 हजार 804 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठातील विविध विभागातील प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा घेतली जाते. मात्र, काही विभागांसाठी उपलब्ध जागांपेक्षा कमी विद्यार्थ्यांनी अर्ज केल्यामुळे या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी परीक्षा घेतली जाणार नाही. संबंधित जागांवर विद्यार्थ्यांना थेट प्रवेश दिला जाणार आहे. विद्यापीठातील अनेक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांच्या संख्येत गेल्या काही वर्षांपासून घट होत चालली आहे.

विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणा-या पुण्यात खासगी विद्यापीठाची संख्या वाढत आहे. त्याचप्रमाणे पारंपरिक अभ्यासक्रमाऐवजी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांना पसंती देत आहेत. तसेच, जिल्हा व तालुकास्तरावर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे विद्यापीठात येऊन प्रवेश घेण्याऐवजी विद्यार्थी आपल्या घराजवळील महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेत आहेत.

प्रॉक्टर्ड पद्धतीने परीक्षा घेतली जाणार असल्याने विद्यार्थ्यांना घरी बसूनही ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देता येईल. परीक्षेत गैरप्रकार होऊ नये, या उद्देशाने विद्यापीठाने काळजी घेतली आहे. या वेळी ह्यूमन प्रॉक्टर्ड पद्धतीचा विद्यापीठाने अवलंब केला आहे. परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवले जाणार असून, ऑनलाइन परीक्षेदरम्यान एकापेक्षा जास्त चेहरे स्क्रीनवर दिसणे, विद्यार्थ्यांची सातत्याने हालचाल होणे, परीक्षा सुरू असताना कॉम्प्युटरवर वेगळा टॅब ओपन करणे, अशा प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवले जाणार आहे. चुकीच्या बाबी निदर्शनास आल्यानंतर वॉर्निंग देऊन नंतर संबंधित विद्यार्थ्यांचे लॉगिन बंद केले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांना इंटर्नशिप देण्याचा विचार : शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रपात सिंह यांचे प्रतिपादन

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, पुणे : 'विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी अभ्यासक्रमासह प्रात्यक्षिकांवर आधारित कौशल्य प्रशिक्षणाची गरज आहे. शालेय वयातच विद्यार्थ्याला प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणे गरजेचे आहे. यासाठी शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमासोबतच 90 तासांची इंटर्नशिप (कार्यानुभव) देण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे,' अशी माहिती शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिली.

'लँड अ हँड इंडिया' (लाही) संस्थेच्या 20 व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित गौरव सोहळ्यात सचिंद्र प्रताप सिंह बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उद्योजक प्रतापराव पवार, शिक्षणतज्ज्ञ डॉ. कमलादेवी आवटे, 'लाही' संस्थेचे सहसंस्थापक सुनंदा माने व राज गिल्डा, अध्यक्ष मिलिंद माने आदी उपस्थित होते. या प्रसंगी 'लाही' संस्थेच्या 20 वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेणा-या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले.

सिंह म्हणाले, 'विद्यमान शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप बदलणे गरजेचे असून, कौशल्याधारित आणि अनुभवाधारित शिक्षणाची आवश्यकता आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीसोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनातील अनुभव देणे अत्यावश्यक आहे. सरकारी अधिकारी व कर्मचा-यांनी केवळ कागदोपत्री काम न करता तळागाळातील कार्यकर्त्यांशी सातत्याने संवाद साधणे गरजेचे आहे. पालकांनीही मुलांवर स्वतःच्या अपेक्षा लादू नयेत. स्वतःच्या अभ्यासाची, कौशल्यांची निवड करण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना द्यायला हवे.'

सुनंदा माने म्हणाल्या, 'वीस वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच कौशल्ये आणि तांत्रिक प्रशिक्षण द्यावे, या उद्देशाने काम चालू केले. राज्यातील शेकडो शाळांमध्ये प्रारूप प्रकल्प मॉडेल यशस्वी ठरल्याने महाराष्ट्र हे कौशल्याधारित शिक्षण व प्रशिक्षणाचे आदर्श राज्य ठरले. भविष्यात अधिकाधिक शाळा आणि विद्यार्थी सामावून घेण्याचा प्रयत्न संस्था करीत राहील.'

प्राजक्ता चौधरी, भाग्यश्री, सावन पहारे आणि गुंजन हिवरकर या विद्यार्थ्यांनी चर्चासत्रात पदवी आणि शालेय शिक्षणक्रमासोबत 'लाही' संस्थेच्या वतीने मिळालेल्या कौशल्याधारित प्रशिक्षणाची माहिती दिली. सूत्रसंचालन अयान पठाण आणि अनिता ढाले केले. गिल्डा यांनी संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्त, देणगीदार, हितचिंतक यांचा परिचय करून दिला.

# पालकांचा शासकीय शाळांकडे कल वाढला

## गुणवत्तेच्या जोरावर 'पीएम श्री' जिल्हा परिषद शाळा अग्रेसर

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, जालना : येत्या 15 जून रोजी सर्व शाळा उघडणार असून उन्हाळ्याची सुट्टी संपण्यासाठी अवघे काही दिवस आहेत. जालना बाकी जिल्हात खासगी शाळांसह शासकीय शाळा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उपलब्ध असून, सध्या शासकीय शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण मिळत आहे. जालना जिल्हात एकूण 48 'पीएम श्री' जिल्हा परिषद प्रशाला व शाळा असून, केंद्रीय प्राथमिक शाळांची संख्या 1,440 असल्याचे सांगण्यात आले आहे. या सर्व शाळांवर शिक्षकांची पदभरती मोठ्या प्रमाणात असून सदरील पदे अतिरिक्त आहेत. शासकीय शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळत असून, विशेष म्हणजे हे सर्व शिक्षण विद्यार्थ्यांना विनामूल्य उपलब्ध आहे. त्यासाठी कुठलेही शुल्क आकारले जात नाही; याउलट विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या सवलती दिल्या जातात.

जालना जिल्हातील शाळा वेळेवर भरून वेळेवर सुटतात. शाळा भरण्याची वेळ व्यवस्थित असल्यामुळे जिल्हातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होत आहे. जिल्हातील 'पीएम श्री' जिल्हा परिषद शाळांमध्ये सध्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. यामध्ये प्रत्येक वर्गात टीव्ही, प्रशस्त व मोठे वाचनालय, संपूर्ण शाळा सीसीटीव्ही निगराणीत, वर्षातून एकदा पाचवी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शैक्षणिक सहल, विज्ञान प्रयोगशाळा, प्रशस्त मोठे मैदान आणि संगणक कक्ष यांसारख्या सुविधांचा समावेश आहे.

याशिवाय पाचवी ते दहावीपर्यंतच्या बाहेरगावच्या विद्यार्थिनींना सायकल वाटप, विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वाटप, आरक्षण असणा-या मुलींना वर्षातून एकदा 2,500 किंवा 6,000 रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. एनएमएमएस परीक्षेत चांगले गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांना बाहेरील राज्यात शैक्षणिक सहलीला जाण्याची संधी मिळते. ग्रामीण भागातील दोन किलोमीटरपेक्षा लांब राहणा-या मुलींना मोफत बस प्रवास, मोफत गणवेश, पाचवी ते आठवीपर्यंत मोफत पुस्तके, ओळखपत्र, बूट व सॉक्स पुरवले जातात. शाळेत पोषण आहार म्हणून रोज खिचडी, आठवड्यातून एकदा केळी, अंडी व बिस्किटे दिली जातात. तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध भेटवस्तू (गिफ्ट) दिल्या जातात. शाळेत वर्षभरात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात, तसेच पिण्याच्या पाण्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रत्येक विद्यार्थ्या कडून कठोर परिश्रम करून घेतले जात असल्यामुळे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात अभ्यासू होत असल्याचे दिसत आहे. जिल्हा परिषद शाळा गुणवत्तेच्या जोरावर सध्या जालना जिल्हात अग्रेसर ठरत आहेत. त्यामुळे पालकही आपल्या पाल्यांना खासगी ऐवजी शासकीय शाळेत प्रवेश देण्यासाठी मोठा पुढाकार घेत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय बदनापूर वसतिगृहात प्रवेश सुरु

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, बदनापूर : कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय प्रकार 4 बदनापूर येथे नववी ते बारावीच्या विद्यार्थिनींकरिता मोफत वसतिगृहाची सुविधा उपलब्ध आहे. मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्याक, दारिद्र्यरेषेखालील कुटुंब, एक पाल्य, अनाथ, स्थलांतरित होऊन आलेल्या कुटुंबातील मुली, पालक दुर्धर आजाराने ग्रस्त असल्यास, नैसर्गिक आपत्तीग्रस्त, शिक्षणापासून वंचित असलेल्या मुली तसेच घरापासून शाळा तीन किलोमीटरपेक्षा जास्त अंतर असलेल्या विद्यार्थिनींकरिता राहण्यासाठी येथे उत्तम दर्जाचे वसतिगृह उपलब्ध आहे. जिल्हा परिषद प्रशाला बदनापूर, ज्ञानगंगा विद्यालय बदनापूर, कन्या विद्यालय बदनापूर, पाथ्रीकर कॉलेज बदनापूर, अहिल्यादेवी होळकर कॉलेज बदनापूर येथे शिक्षणाकरिता प्रवेश घेऊन वसतिगृहातील रिक्त असलेल्या जागेवर प्रवेश करता येईल.

प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थिनी व पालकांनी अधिक माहितीसाठी श्रीमती एस. आर. गांगे यांच्याशी 8862028889 या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## गटशिक्षणाधिकारी कोल्हे यांच्या उपस्थितीत पुस्तक वितरण

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, जालना : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभाग मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत जालना तालुक्यात विद्यार्थ्यांना वेळेत पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी पाठ्यपुस्तक वितरण गाडीला हिरवा झेंडा दाखवून वितरणास प्रारंभ गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात पुढील आठवड्यात होत आहे. जिल्हातील शाळा 15 जूनपासून सुरु होत आहे. जिल्हा परिषदेसह खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. जालना तालुक्यातील शाळांना केंद्रनिहाय पाठ्यपुस्तके वितरित करण्यात येणार आहेत. या वेळी गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे, विस्तार अधिकारी डॉ. रवींद्र काकडे, केंद्रप्रमुख सुनील ढाकरके, अरुण देशमुख, साधन व्यक्ती राजे, जाधव, गायकवाड तसेच तालुक्यातील मुख्याध्यापक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच आवश्यक पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत, यासाठी शिक्षण विभागाकडून नियोजनबद्ध पद्धतीने वितरण प्रक्रिया राबविण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## शिक्षक पात्रता कार्यशाळा संपन्न

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, जालना: जिल्हा परिषद जालना प्राथमिक, माध्यमिक शिक्षण विभाग मत्स्योदरी शिक्षण संस्था, फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर जालना व यांच्या संयुक्त विद्यमानने जालना शिक्षक पात्रता परीक्षा मार्गदर्शन कार्य शाळा उत्साहत संपन्न झाली ही कार्य शाळा दिनांक 10 जून ते 11 जून 2026 दरम्यान कर्मयोगी अंकुशराव टोपे महाविद्यालय येथे निः शुल्क (मोफत ) आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणुन शिक्षण क्षेत्रातील तज्ञ प्रा. बाळसाहेब शिंदे, प्रा विजय सुरासे,



प्रा. शरद जाधव, प्रा. अनिल कोलते प्रा. म्हणुन शिक्षण क्षेत्रातील तज्ञ या कार्यशाळेला मार्गदर्शक प्रा. बाळसाहेब शिंदे, प्रा विजय सुरासे,

प्रा. शरद जाधव, प्रा. अनिल कोलते प्रा. विठ्ठल पुंगळे, प्रा. अभील अंतरकर ,प्रा. प्रशांत कदम व प्रा.डॉ. अशोक दाहिते होते.

या कार्यशाळेचे आयोजण डॉ. बी.आर गायकवाड प्रशासकीय अधिकारी, श्री बाळासाहेब खरात शिक्षणाधिकारी (मा), श्रीमती संगीता भागवत शिक्षणाधिकारी (प्रा), व श्री चतरसिंग परदेशी वेतन अधिक्षक (मा) होते

तर कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती डॉ प्रमोद कुमावत वरिष्ठ अधिव्याख्याता (डीअट) डॉ सकील खान, प्रा मुकुंद कुलकर्णी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, डॉ. दादासाहेब गजहंस प्राचार्य क. अ. टोपे महाविद्यालय हे होते.

## स्वाधार योजनेच्या लाभासाठी प्रथम वसतिगृह प्रवेश अर्ज आवश्यक

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा, जालना: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणा-या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. चालू 2026 - 27 शैक्षणिक वर्षापासून स्वाधार योजनेचा लाभ मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. गुणवत्तेनुसार अथवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही, अशा विद्यार्थ्यांनाच स्वाधार योजनेसाठी पात्र मानण्यात येणार आहे.




Publisher and Owner Sandeep Narayan Thakre Printer Santosh Vishnu Bhutekar at Jagmitra offset, Bhokardan Naka, Sambhaji Nagar, Jalna 431203 ( Maharashtra ) Place of publication office Daily Shikshan Astra, Plot No.11, Varsha Niwas, Sukh-shanti Nagar Mantha Road, Jalna. 431203 ( Maharashtra ) Editor : Sandeep Narayan Thakre, 7972212030 RNI MHMAR/25/A0848 Email. Shikshanastra@gmail.com Advisory Body Adv.Adinath Kadam & Adv.Yogesh Somani,

हे पत्र प्रकाशक, मालक संदिप नारायण ठाकरे यांनी मुद्रक संतोष विष्णु भुतेकर यांच्या जगमित्र ऑफसेट, भोकरदन नाका, संभाजीनगर, जालना 431203 ( महाराष्ट्र ) येथे छापुन दैनिक शिक्षण अस्त्र, कार्यालय प्लॉट नं 11, वर्षा निवास, सुख शांती नगर, मंठा रोड, जालना 431203 ( महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले आहे. संपादक ः संदिप नारायण ठाकरे या अंकात प्रसिध्द झालेले मजकुर लेख व त्यामधुन होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. सर्व वाद जालना न्यायालया अंतर्गत आर एन आय MHMAR/25/A0848 कायदेशीर सल्लागार ः ॲड.आदिनाथ राम कदम व ॲड.योगेश गणेश सोमाणी